प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)

(०२३५८) २८२३८७

अंक ८४/२०१७ दिनांक २०/१०/२०१७ कालावधी ५ दिवस


**डॉ. सुभाष चव्हाण,** विभाग प्रमुख, कृषिविद्या विभाग ९४२२४३१०६७

**डॉ. ज्ञानेश्वर जगताप,** नोडल ऑफिसर, कृषिविद्या विभाग ९४०३९८८१४३

**प्रा. विरेश चव्हाण,** तांत्रिक अधिकारी, कृषिविद्या विभाग ९४२२०६५३४४


| १मागील हवामान सारांश दि. १६/१०/२०१७ ते २०/१०/२०१७ | | |
|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | |
| पाऊस (मिमी) १/१/१६ पासून | : | |
| पाऊस (मिमी) (गेल्या वर्षी) | : | |
| कमाल तापमान (अं.से) | : | |
| किमान तापमान (अं.से) | : | |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | |

हवामान पूर्वानुमान (२१/१०/२०१७ सकाळी ८:३० पासून २५/१०/२०१७ सकाळी ८:३० वाजेपर्यंत)

| हवामानांचे घटक | : | २१/१० | २२/१० | २३/१० | २५/१० | २५/१० |
|---|---|---|---|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | ० | ० | ३ | ४ | ० |
| कमाल तापमान (अं.से) | : | ३२ | ३२ | ३४ | ३६ | ३६ |
| किमान तापमान (अं.से) | : | २६ | २५ | २४ | २३ | २३ |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | : | ३ | ३ | ४ | ३ | ३ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ९६ | ९२ | ९५ | ८७ | ६४ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ३२ | ५० | ५४ | ४१ | ३० |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ००३ | ००३ | ००३ | ००४ | ००५ |
| वाऱ्याची दिशा | : | नै.प. | नै.द. | नै.द. | नै.द. | नै.प. |

## :हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला:

**दिनांक २३ व २४ ऑक्टोबर २०१७ रोजी पावसाची शक्यता आहे. दिनांक २१ ते २५ ऑक्टोबर, २०१७ पर्यंत अवकाश मेघाच्छादित राहिल. दिनाकं २१ ते २५ ऑक्टोबर, २०१७ पर्यंत वाऱ्याचा वेग ३ ते ५ किमी प्रति तास राहिल.**

| पिक | पिक अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | लोंब्या भरणे आणि परिपक्वता | • जिल्हात तूरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असल्यामुळे तयार झालेल्या हळव्या भात जातीची कापणी पुढे ढकलावी किंवा पक्व भाताच्या लोंब्याची कापणी करून त्याची मळणी करावी आणि भात सावलीमध्ये वाळवावे.<br>• पावसाची उघडीप असताना तयार झालेल्या भात पिकाची सकाळी कापणी करून त्याची लगेच मळणी करावी आणि भात उन्हामध्ये चांगले वाळवावे.<br>• सध्या भात पिक तयार अवस्थेत असून बऱ्याच ठिकाणी लष्करी अळींचा प्रादुर्भाव झाला आहे. जेथे शक्य असेल तेथे भात पिकाची कापणी करून घ्यावी. |
| चिकू | वाढीची अवस्था | • चिकूवरील फळगळ या रोगाच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये (मेटालॅक्झिल ८ टक्के + मॅन्कोझेब ६४ टक्के) या संयुक्त बुरशीनाशकाचे ०.२ टक्के (२० ग्रॅम/१० लिटर पाणी) द्रावण संपूर्ण झाडावर फवारावे.<br>• चिकू बी पोखरणाऱ्या अळीच्या व्यवस्थापनासाठी डेल्टामेथ्रिन २.८ टक्के प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. द्रावणास स्टिकरचा वापर करावा. (सदर नमुद केलेले किटकनाशक लेबलक्लेम नाही.)<br>• मोठया आकाराची काढणीची फळे तयार झाली असून ती काढणीच्या अवस्थेत आहेत. तयार फळे सकाळी दहाच्या अगोदर व दुपारी चारच्या नंतर अतूल चिकू झेल्याच्या सहाय्याने काढावीत. |
| नारळ/ सुपारी | -- | • नारळ पिकास खताची दुसरी मात्रा द्यावी. (८५० ग्रॅम युरिया + १ किलो सिंगल सुपर फॉस्फेट + ६५० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश), नारळ बागेची स्वच्छता राखावी.<br>• नारळाच्या कोमकुजव्या रोगाच्या नियंत्रणासाठी कुजलेला कोम साफ करून त्यामध्ये १ टक्का बोर्डो मिश्रण किंवा कॉपर ऑक्सीक्लोराईड २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून ओतावे.<br>• नारळावरील गेंडाभुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये शेणखताच्या खड्ड्यात दर दोन महिन्यांनी कार्बारील पावडरचे (१० लिटर पाण्यात २० ग्रॅम) मिश्रण तयार करून फवारावे.<br>• नारळावरील सोंडया भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी भुंग्यानी पाडलेली भोके १० टक्के कार्बारील भुकटी व वाळूने बुजवून घ्यावीत. तसेच खोडावर १ मिटर उंचीवर गिरमिटाच्या सहाय्याने १५ ते २० सें.मी. खोल तिरपे भोक पाडून त्यामध्ये २० मिली ३६ टक्के प्रवाही मोनोक्रोटोफॉस किंवा २० टक्के प्रवाही क्लोरोपायरीफॉस नरसळयाच्या सहाय्याने ओतावे आणि भोक सिमेंटच्या सहाय्याने बंद करावे. |
| भाजीपाला लागवड | | • पडवळ, घोसाळी, शिराळी इत्यादी फळीभाज्यांवर फळमाशीचा प्रादूर्भाव होण्याची शक्यता आहे, त्याच्या नियंत्रणासाठी “रक्षक” सापळे प्रती हेक्टरी ४ नग लावावेत.<br>• रब्बी हंगामासाठी टोमॅटो, वांगी व मिरची यांची रोपे तयार करावीत. |
| दुभती जनावरे/ शेळया | – | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी पुरवठयाची व्यवस्था करावी. |
| सुचना | – | • निरनिराळे किडी, रोग जास्त प्रमाणात आढळल्यास नजिकच्या कृषि विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. |